# कल्याण डोंबिवली महानगरपालिका, कल्याण

## थेट मुलाखत (Walk in Interview)

कल्याण डोंबिवली महानगरपालिका क्षेत्रामधील विविध विकास योजनेतील रस्ते, आरक्षणे व प्रकल्प **प्रस्तावांखालील** जमिनींचे भूसंपादन करणे व तदअनुषंगिक कामकाजासाठी, भूसंपादनाचा अनुभव असलेले **सेवानिवृत्त** अधिकारी/कर्मचारी यांच्यामधून निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात करार पध्दतीने खालीलप्रमाणे नेमणूक करणेकामी थेट मुलाखत **(Walk in Interview) दि. ८/३/२०१८ (गुरू-वार) रोजी सकाळी ११.०० वाजता** आयोजित करण्यात येत आहे.

| अ क्र | पदनाम | पद – संख्या | अनुभव |
|---|---|---|---|
| १ | भूसंपादन अधिकारी (वर्ग–१) | ४ | १) अतिरिक्त जिल्हाधिकारी/उपजिल्हाधिकारी या पदावरील कामाचा कमीत कमी ३ वर्षाचा अनुभव असावा, अथवा<br>२) समकक्ष पदाचा MMRDA, MHADA, CIDCO तसेच शासकीय/निमशासकीय कार्यालयीन भूसंपादनाचा कमीत कमी ३ वर्षे अनुभव असावा. |
| २ | भूसंपादन अधिकारी (वर्ग–२) | ४ | १) उप अधिक्षक भूमी अभिलेख/तालुका निरीक्षक भूमी अभिलेख या पदावरील भूसंपादनाचे कामाचा कमीत कमी ३ वर्षाचा अनुभव असावा,<br>२) शासकीय अथवा निमशासकीय कार्यालयाकडील भूसंपादनाचा कमीत कमी ३ वर्षे अनुभव असावा |
| ३ | भूसंपादन अधिकारी (वर्ग–१ व वर्ग–२) यांना सहाय्यक | ३ | मंडळ अधिकारी म्हणून काम केल्याचा कमीत कमी ३ वर्षे अनुभव असावा. |

**(अ) मुलाखतीचा दिनांक व वेळ :– दि. ८/३/२०१८ (गुरू-वार) सकाळी ११.०० वा.**

**(ब) मुलाखतीचे ठिकाण** :– आयुक्त कार्यालय, कल्याण डोंबिवली महानगरपालिका, प्रशासकीय भवन दुसरा मजला, शंकरराव चौक, कल्याण (पश्चिम), ता.कल्याण, जि.ठाणे.

**(क) दरमहा एकत्रित मानधन आणि कमाल वयोमर्यादा** :– महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्र.संकीर्ण–२७१५/प्र.क्र.१००/१३, दि.८ जानेवारी, २०१६ नुसार राहील.

**सर्वसाधारण सूचना :–**

(१) वरीलप्रमाणे कामाचा अनुभव असलेल्या इच्छूक सेवानिवृत्त अधिकारी/कर्मचारी यांनी त्यांचे संपूर्ण नांव, निवासाचा पत्ता, पत्रव्यवहाराचा पत्ता, भ्रमणध्वनी क्रमांक, जन्मदिनांक, शैक्षणिक अर्हता, संबंधित पदाचा अनुभव, सेवानिवृत्तीपुर्वी मिळत असलेले एकूण वेतन इत्यादीबाबत सविस्तर तपशिल असलेला संगणकावर टंकलिखित अर्ज आणि त्याबाबतचे कागदपत्रांसह स्वखर्चाने दि. ८/३/२०१८ रोजी सकाळी ९.३० वा. उपरोक्त ठिकाणी उपस्थित राहावे. अर्जाचा नमुना वेबसाईटवर प्रसिध्द करण्यात आलेला आहे.

(२) सदरहू नियुक्ती निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात करार पध्दतीने ६ महिने कालावधीसाठी असल्याने निवड होणाऱ्या उमेदवाराचा कल्याण डोंबिवली महानगरपालिका आस्थापनेशी कोणत्याही प्रकारचा संबंध राहणार नाही. तसेच याकामी कोणत्याही न्यायालयात दावा दाखल करता येणार नाही. तसेच नियुक्तीच्या कालावधीमध्ये संबंधितांचे काम समाधानकारक नसल्यास, तसेच कोणत्याही स्वरुपाची गैरवर्तणूक केल्यास कोणतेही कारण न देता नियुक्ती रद्द करण्यात येईल.

(३) जाहिरातीनुसार विहित केलेला थेट मुलाखतीचा दिनांक, वेळ व इतर बाबींमध्ये कोणत्याही टप्प्यावर, कोणतेही कारण न देता बदल अथवा रद्द करण्याचे अथवा निवड/नियुक्ती प्रक्रिया कोणत्याही टप्प्यावर कोणतेही कारण न देता रद्द करण्याचे अधिकार आयुक्त, कल्याण डोंबिवली महानगरपालिका यांना राहतील.

**(Website : www.kdmc.gov.in)**

( पी. वेलरासू )
आयुक्त,
कल्याण डोंबिवली महानगरपालिका, कल्याण

अर्जाचा नमुना

# कल्याण डोंबिवली महानगरपालिका, कल्याण

उमेदवाराचा फोटो
( येथे पासपोर्ट साइज फोटो चिकटवा. )

मा.आयुक्त सो,
कल्याण डोंबिवली महानगरपालिका,
कल्याण.

**विषय :– "............................................" या पदासाठी अर्ज**

(१) **संपुर्ण नाव** :– श्री./श्रीमती..........................................................................................

(२) **पत्रव्यवहाराचा पत्ता :–** ..........................................................................................

........................................................................ दुरध्वनी/भ्रमणध्वनी क्र...............................

(३) **निवासाचा पत्ता :–** ..........................................................................................

..........................................................................................

(४) जन्मदिनांक :–

| तारीख | महिना | वर्ष |
|---|---|---|
| | | |

(५) मुलाखत दिवशीचे वय : (कमाल वयोमर्यादा ७० वर्षापेक्षा अधिक नसावी)

| वर्षे | महिने | दिवस |
|---|---|---|
| | | |

(६) **शैक्षणिक अर्हता** :–

| अ.क्र | शिक्षण | शाळा/मंडळ/विद्यापीठाचे नाव | उत्तीर्ण महिना व वर्ष | टक्केवारी / श्रेणी |
|---|---|---|---|---|
| १ | एस.एस.सी. | | | |
| २ | एच.एस.सी. | | | |
| ३ | पदवी | | | |
| ४ | | | | |
| ५ | | | | |

(७) **कामाचा एकूण अनुभव :– .......... वर्षे ........... महिने**

| अ क्र | पदाचे नांव | शासकीय/निमशासकीय कार्यालयाचे नांव व पत्ता | कार्यरत कालावधी | | एकूण कालावधी |
|---|---|---|---|---|---|
| | | | दिनांकापासून | दिनांकापर्यंत | |
| १ | | | | | |
| २ | | | | | |
| ३ | | | | | |

(८) सेवानिवृत्तीपुर्वी मिळत असलेले एकूण वेतन रु.

(९) कोणतीही विभागीय चौकशीची कारवाई चालू किंवा प्रस्तावित आहे का ? (होय / नाही)
– असल्यास त्याबाबतचा सविस्तर तपशिल सोबत जोडावा.

(१०) पूर्वी फौजदारी अथवा दिवाणी प्रकरणात शिक्षा झाली होती का ? (होय / नाही)
– झाली असल्यास त्याचा तपशिल नमुद करण्यात यावा व न्यायालयीन निर्णयाची प्रमाणित प्रत अर्जासोबत जोडावी

(११) पोलीस चौकशी/न्यायालयीन प्रकरण प्रलंबित/प्रस्तावित आहे का ? (होय / नाही)
– असल्यास त्याबाबतचा सविस्तर तपशिल सोबत जोडावा.

(१२) स्थानिक पोलीस स्टेशनचा पत्ता :– ..........................................................................................

मी या अन्वये प्रतिज्ञापूर्वक असे जाहिर करतो/करते की, वरील माहिती जाणीवपूर्वक तसेच विश्वासपूर्वक दिली असून ती खरी आहे. जाहिरातीत दिलेल्या सर्व निकषांनुसार मी पात्र आहे. त्यापैकी कोणतीही माहिती खोटी आढळल्यास माझा अर्ज फेटाळून लावल्यास किंवा निवडीच्या कुठल्याही टप्प्यावर माझी उमेदवारी रद्द केल्यास त्याबाबत माझी कोणतीही तक्रार राहणार नाही.

आपला/आपली विश्वासू

ठिकाण :– कल्याण.
दिनांक :– /३/२०१८

अर्जदाराची सही : ..............................